॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. १४ (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाच्या वतीने घेण्यात आलेल्या परिसर मुलाखतीमध्ये पॉलिमर केमिस्ट्रीच्या तीन विद्यार्थ्यांची निवड रायगड जिल्ह्यातील सुप्रीम पेट्रोकेम लि. या कंपनीसाठी झाली.

एम.एस्सी. पॉलिमर केमिस्ट्रीच्या विद्यार्थ्यांसाठी या परिसर मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. कंपनीचे व्यवस्थापक अशिष परांजपे, ए.के. मेटांगळे, विकास मुळये उपस्थित होते. १२ विद्यार्थ्यांपैकी जगदीश पाटील, लौकिक पाटील व केतन मराठे या विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. कक्षाचे समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ. उज्वल पाटील, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतींचे व्यवस्थापन केले. रासयनिकशास्त्र प्रशाळेचे डॉ. अमरदिप पाटील, डॉ. विकास गिते यावेळी उपस्थित होते. कुलगुरु प्रा. व्ही.एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, प्रशाळेचे संचालक प्रा. धनंजय मोरे यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

**बातमी नं. २**

जळगाव, दि. १४ (प्रतीनिधी) :- कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील आंतरविद्याशाखीय अभ्यास प्रशाळा आणि विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त आदिवासी विद्यार्थी आत्मविश्वास व प्रेरणा कार्यशाळेला प्रारंभ झाला असून दि.१६ मार्चपर्यंत कार्यशाळा होणार आहे.

कार्यशाळेचे उदघाटन कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झाले. यावेळी अरुण पवार, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, यावल, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळ, प्रशाळेच्या संचालिका डॉ. मनिषा इंदाणी, समन्वयक डॉ. संतोष खिराडे उपस्थित होते. कार्यशाळेत जळगाव धुळे नंदुरबार आणि विदयापीठ प्रशाळातील विदयार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कुलसचिवांनी आदिवासी विदयार्थ्यांसाठी विदयापीठामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनाचा आढावा घेतला. नंदुरबार मध्ये विदयापीठाची अॅकडमी स्थापन होत असून लवकर विविध अभ्यासक्रम सुरू होत असून आदिवासी भागातील विदयार्थ्यांना उच्च शिक्षण व स्पर्धापरिक्षेकरित विदयापीठ सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. अरुण पवार यांनी आदिवासी विद्यार्थी हिताच्या योजना आणि अमंलबजावणी या विषयावर आदिवासी विदयार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्घाटन सत्रात आदिवासी विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास व प्रेरणेची नेमकी गरज का असते या अनुषंगाने ही कार्यशाळा आयोजित करण्यामागील विद्यार्थी विकास विभागाची भूमिका विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. जयेंद्र लेकुरवाळे यांनी मांडली.

कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात भारतातील आदिवासी नायक या विषयावर डॉ. विशाल पराते यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन आणि आभार डॉ. रणजित पारधे यांनी व्यक्त केले.

**बातमी नं. ३**

जळगाव, दि. १४ (प्रतीनिधी) :- :- कवयित्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन शास्त्र प्रशाळेत ११ मार्च रोजी राष्ट्रीय विज्ञान दिन व जागतीक महिला दिन साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.पवित्रा पाटील यांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रशाळेचे संचालक प्रा.धनंजय मोरे होते. सदर कार्यक्रमात प्रा.डॉ.एस.एस.राजपूत, डॉ.लिना चौधरी व डॉ. दिनेश सावंत शास्त्रज्ञ राष्ट्रीय रसायन प्रयोगशाळा पुणे, यांनी व्याख्याने दिली.

डॉ.लिना चौधरी यांनी आहार व योगाचे फायदे व संबंधित माहिती दिली. डॉ.दिनेश सावंत यांनी संशोधन क्षेत्रात असलेल्या संधी व संशोधन कसे करावे यांचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रा.डी.जी.हुंडीवाले, प्रा. डी.एस.दलाल,डॉ.व्ही.व्ही.गीते, डॉ.ए.एम.पाटील (समन्वयक) व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

…………………………………………………………………………………………………………

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १४ मार्च, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी